# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -४६९-२०२२-पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| विक्रम प्रल्हाद जगताप | १) निवासी नायब तहसिलदार<br>२) संकलन अभिलेख, तहसिल कार्यालय हवेली,<br>९३१, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ |

(निर्णय दि.१२.०२.२०२६ )

तक्रारदार यांनी दिनांक १०.१०.२०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारी मध्ये तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्रमांक १७१-२०२२- पुणे. प्रकरणी माहिती पुरविण्याचे आदेश दिले आहेत तथापि - जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण, दिशाभूल करणारी, चुकीची माहिती दिली आहे तरी संबंधितावर कारवाई करावी ॰ अशी मागणी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

सदर तक्रारीचे अनुषंगाने उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की सदर प्रकरणी आयोगाने आदेश पारित केल्यानंतर तक्रारदार यांना माहितीचे प्रदान झाले आहे.

सदर प्रकरणी तक्रारदार यांना माहितीचे प्रदान झाले असल्याने या तक्रार प्रकरणी पुढे कार्यवाही अपेक्षित नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -४६९-२०२२-पुणे जावक क्र. 653 दिनांक-. 10/2/2026